२०१ ०८

# सरदार वल्लभभाई पटेल नगर
# रहिवाशी वेल्फेअर असोसिएशन

॥ एकमेका सहाय्य करू । अवघे धरू सुपंथ ॥

नोंदणी क्र. : महाराष्ट्र राज्य/मुंबई/१९६६/२०१२/जी.बी.बी.एस.डी.

दिनांक: ०७ फेब्रुवारी २०२०

प्रति,

**मा बाळासाहेब पाटील**
**कॅबिनेट मंत्री**
सहकार व पणन, महाराष्ट्र राज्य,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई ४०० ००१.

**विषय : गृहनिर्माण धोरणांतर्गत मुंबईतील म्हाडा गृहनिर्माण संस्था / वसाहत / अभिन्यास पुनर्विकास विनिमयात होऊ घातलेल्या प्रस्तावित बदलात गृहनिर्माण संस्थांचे महासंघ / युनियन / असोसिएशन यांच्या अधिकारांवर अंकुश ठेवण्याबाबत निवेदन.**

महोदय,

सविनय नमस्कार !

मुंबई शहर व उपनगरातून असलेल्या म्हाडा प्राधिरणाच्या गृहनिर्माण संस्थांच्या पुनर्विकास प्रकल्पना चालना देण्याकरीता संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत बदल होण्याचे संकेत वृत्तपत्रातील बातम्यांमधून मिळत आहेत.

विनिमयात बदल करत असतानाच सामूहिक पुनर्विकासाचे फायदे शेवटच्या सदनिकाधारकास मिळावे याकरिता गृहनिर्माण संस्थांचे सामूहिक प्रतिनिधित्व करण्याकरिता त्या त्या वसाहती / अभिन्यासातील कार्यरत महासंघ / युनिअन / असोसिएशन आणि प्रस्ताव मंजूर झालेला विकासक हे एकत्रितरित्या पुनर्विकास कक्ष म्हाडा याना पुनर्विकास योजना सादर करतील अशा प्रकारची मांडणी होणार आहे असे समजते.

***सामूहिक पुनर्विकासातून होणार पुनर्विकास हा लाभदायकच असणार असून त्यातून सामान्य सदनिकाधारकाचे नवीन इमारतीमध्ये जाण्याचे स्वप्न साकार होणार यात शंकाच नाही परंतु त्याच्या गृहनिर्माण संस्थेच्या वतीने पुनर्विकास प्रस्ताव सादर करणाऱ्या महासंघ / युनियन / असोसिएशन च्या पदाधिकाऱ्यांवर अंकुश असणे गरजेचे आहे.***

लिपिक
मंत्री, सहकार, पणन
यांचे कार्यालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
११/३/२०२०



Scanned with CamScanner

भूतकाळातील विविध म्हाडा वसाहती / अभिन्यासातील कार्यरत महासंघ / युनियन / असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे एकूणच धोरण आणि त्याकरिता त्यांना देण्यात आलेल्या वैधानिक अधिकारांचे त्यांनी केलेले वापर विकासकाला पोषक अशा प्रकारचे राहिल्याने गृहनिर्माण संस्थांमधील त्यांच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने सदनिकाधारकांचा विरोध निर्माण होऊन प्रत्यक्षात कामाला सुरवातच झाली नाही आणि जेथे रेटून नेण्याचा प्रयत्न करण्यात आला तेथे अनेक तक्रारी सहकार विभागात दाखल झाल्या असून आजतागायत सदर प्रकरणांवर संबंधित उप निबंधकाच्या दालनात सुनावण्या सुरु आहेत.

***परिणामी वैयक्तिक गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास करण्याचा अधिकार अबाधित ठेवून वैयक्तिक गृहनिर्माण संस्था हीच पुनर्विकासाचे एकक मानून वसाहती अथवा अभिन्यासातील महासंघ / युनियन / असोसिएशन यांच्या अधिकारांची आखणी व मांडणी करण्यात यावी अशी मागणी सदर असोसिएशन आपणाकडे करत आहे जेणेकरून वैयक्तिक गृहनिर्माण संस्थेचे प्रतिनिधित्व पुनर्विकास योजनेदरम्यान महत्वाचे राहील. सारांशाने संबंधित वसाहत व अभिन्यासातील महासंघ / युनियन / असोसिएशन ची स्थापना या तेथील गृहनिर्माण संस्थाच करत असतात.***

**आपण आमच्या निवेदनाचा गांभीर्याने विचार करून संबंधित उप निबंधकाच्या अधिपत्याखाली महासंघ / युनियन / असोसिएशनचे पदाधिकारी सदस्य गृहनिर्माण संस्थेच्या हिताला प्राधान्य देऊन विकासकासोबत काम करतील आणि पुनर्विकास प्रक्रियेत पारदर्शकता ठेवतील अशा प्रकारचे धोरणात्मक आदेश पारित करावेत हि विनंती.**

धन्यवाद,

आपले विश्वासू

**स. व. प. न. रहिवासी वेल्फेअर असोसिएशन**


| श्री आनंद जाधव | श्री सुर्यकांत ननावरे | श्री अनिल परदेशी |
|---|---|---|
| ९९६७०९४०९४ | ९८२१७२७९९४ | ९८३३०९२४१८ |
| (अध्यक्ष) | (सचिव) | (खजिनदार) |





Scanned with CamScanner